# घटक ४ (ब) : ललित निबंध

## आकाश

**— वि. वा. शिरवाडकर**

अनुक्रमणिका


**४.० उद्दिष्टे**

**४.१ प्रास्ताविक**

**४.२ शब्दार्थ, वाक्प्रचार आणि टीपा**

**४.३ ललितनिबंधाचे अध्ययन**

४.३.१ 'आकाशा'विषयी चिंतन

४.३.२ कुसुमाग्रजांचे व्यक्तिमत्त्व

४.३.३ आकाशाचा वेगळा अनुभव

**४.४ नमुना उत्तरे**

**४.५ अधिक अध्ययन**

४.५.१ लेखक परिचय

**४.६ सारांश**

**४.७ सरावासाठी स्वाध्याय**

**४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके**

## ४.० उद्दिष्टे

'ललितनिबंध' हा महत्त्वाचा साहित्यप्रकार आहे. कविवर्य कुसुमाग्रज उर्फ वि. वा. शिरवाडकर यांच्यासारख्या सिद्धहस्त लेखकाच्या 'आकाश' या ललितलेखाचे अध्ययन केल्यावर तुम्ही–

- 'ललितनिबंध' या साहित्यप्रकाराची वैशिष्टचे स्पष्ट करू शकाल
- वि. वा. शिरवाडकरांच्या ललितलेखनाचे विशेष सांगू शकाल
- 'आकाश' या ललितनिबंधातील आशय तुम्ही विशद करू शकाल

## ४.१ प्रास्ताविक

ललितनिबंध हा एक आत्मनिष्ठ साहित्यप्रकार आहे. तसे पाहिले तर साहित्यातून व्यक्त होणारे अनुभव 'मी'च्या जीवनातीलच असतात.

ललितनिबंध हा लेखकाला एखाद्या विषयासंबंधी जे जाणवले त्याचाच आविष्कार असतो. लेखकाच्या मनातील विचार ज्या अनुभवांद्वारा सुचले त्या अनुभवांना महत्त्व देऊनच व्यक्त केले जातात.

इंग्रजीत 'पर्सनल एसे' हा साहित्यप्रकार होता. त्याच्यापासून प्रेरणा घेऊन ललितनिबंध हा प्रकार विकसित झाला. 'पर्सनल एसे'ची आदिरूपे म्हणजे फडक्यांची गुजगोष्ट किंवा वि. स. खांडेकरांचा लघुनिबंध. गुजगोष्ट किंवा लघुनिबंध विकसित होत गेला व त्यांचे प्रगल्भ आणि व्यापक असे रूप म्हणजे ललितनिबंध. ललितनिबंधाचे लेखन कधी 'मी'त्वाच्या आविष्कारासाठी होते तर कधी विषयवस्तूच्या अंगाने होते; तर कधी या दोहोंचाही तोल साधण्याचा प्रयत्न होतो.

'आकाश' या ललितनिबंधात शिरवाडकरांच्या संपन्न व्यक्तिमत्त्वातील 'मी' आकाश पाहून कसा चिंतनशील होतो ते पाहावयाचे आहे.

## ४.२ शब्दार्थ, वाक्प्रचार आणि टीपा

**निर्लेप** – स्वच्छ
**दखल्याखुपल्या** – दुखावलेल्या
**खचलेल्या** – भरलेल्या
**शतावधी** – शेकडो
**अतर्क्य** – तर्काच्याही पलीकडचे
**गांजणे** – त्रास देणे
**भ्रमण** – फिरणे
**बाष्प** – वाफ
**कःपदार्थ** – क्षुद्र
**निःसंग** – मुक्त
**तिलांजली देणे** – त्याग करणे, सोडून देणे
**निराशय** – आशयहीन

## ४.३ ललितनिबंधाचे अध्ययन

दिलेला ललितनिबंध वाचा, मनन करा.

### आकाश

आकाश म्हणजे एक अलौकिक मौनीबाबा : हजार प्रश्न विचार म्हणणारे आणि कोणत्याही प्रश्नाचे उत्तर न देणारे. अर्थात आकाशाचे हे एकच एक रूप नव्हे. कृष्णासंबंधी असे एक सुभाषित आहे, की ज्याला जे रूप हवे त्या रूपामध्ये त्याला तो भेटत असे. आकाशाचेही तसेच आहे. आपल्या मनःस्थितीशी संवाद साधणारे रूप ते नेहमी धारण करते. अशा या अनेकरूपी आकाशाच्या संगतीचा छंद मला फार पूर्वीपासून लागला. कोठल्यातरी माळमैदानावर किंवा टेकडीवर पडून आकाशाकडे पाहत

राहणे हा मला केवळ छंदच नव्हता तर काही वर्षे तरी व्यसनच होते. आकाशाकडे पाहताना आपण नेहमी प्रश्नच विचारत असतो असे नाही. केव्हा निर्लेप मनाने त्याच्या अथांग सौंदर्यात आपण बुडून जातो, तर केव्हा दुखल्याखुपल्या मनासाठी सांत्वनाची मागणीही त्याच्याकडे करत असतो. पण असे प्रसंग सोडले तर नक्षत्रांनी खचलेल्या आकाशाकडे बघताना भरतीच्या लाटांसारखे शतावधी प्रश्न आपल्या जाणिवेत घोंघावत येतात. रात्रीच्या एकांतात आकाशाकडे पाहताना आपण जीवनाच्या सरहद्दीवर येऊन ठेपतो आणि शहरातील रस्त्यात वा घरात सहसा न भेटणारे प्रश्न आपल्याभोवती गर्दी करतात. या सगळ्या असीम आणि अतर्क्य विश्वात आपले स्थान काय आहे आणि आपण त्याच्याशी कसे जोडलेले आहोत? प्राचीन काळापासून कोट्यावधी लोकांना गांजणारे हे प्रश्न मला अगदी नव्याने भिडतात आणि अस्वस्थ, अगतिक करतात.

माझ्या टेबलावरती एक चित्र आहे. चित्र नव्हे, छायाचित्र. कॉम्प्युटरच्या साहाय्याने घेतलेले, आपल्या आकाशगंगेच्या एका कोपऱ्याचे ते रंगीत छायाचित्र आहे. कल्पनेचा विलास नव्हे तर आकाशातील वास्तवाचे एक दर्शन. काय आहे त्यात? मुंबईच्या चौपाटीवर जसे आणि जितके रेतीचे कण आहेत तितकी आणि तशी नक्षत्रे आकाशगंगेच्या त्या छोट्या कोपऱ्यात आहेत. रेतीच्या या असंख्य कणांतील एक जरा ठळक असलेला रेतीचा कण म्हणजे आपला सूर्य आणि त्या कणाभोवती भ्रमण करणारी एक अदृश्य कणिका म्हणजे आपली पृथ्वी. त्या पृथ्वीवरील आपला एक देश. त्या देशातील एक प्रांत, त्या प्रांतातील एक गाव आणि त्या गावातील कोणी एक मी.

या विचारांच्या वा कल्पनांच्या समुद्रात आपण एकदा शिरलो, की आपले नाव, आपले गाव, देश, धर्म, नीती-साऱ्याच गोष्टी, ज्या व्यवहारात आपल्याला डोंगरासारख्या प्रचंड वाटतात, त्या उन्हात टाकलेल्या बर्फाच्या खड्यासारख्या विरघळतात. क्षुद्र आणि निराशय होतात. ज्याच्या विस्ताराशी कल्पना करताना आपल्या कल्पनेलाही भोवळ येते अशा एका नादात सीमाहीन, कालहीन अस्तित्वाचे आपण एक खालच्या तळातील हिस्सेदार फक्त होतो. पावसाळ्यात आभाळ व्यापून टाकणाऱ्या मेघछत्रातील एखाद्या बाष्पकणाएवढे. किंबहुना, त्याहूनही फार लहान. आपल्या सौंदर्यात विश्वाच्या विराटतेची कल्पना आपल्याला करता येत नाही, त्याप्रमाणे विश्वाच्या संदर्भात आपल्या लहानपणाची कल्पनाही आपण करू शकत नाही. पण आकाशाशी नाते जोडल्यावर, आपण लहान आहोत की मोठे, हा प्रश्नही गळून पडतो. कारण त्या विराट व्यवहारात आकारमानाचे मोजमापही निकामीच ठरते. ज्याला आपण महानतेची परिसीमा मानतो तो सूर्यदेखील त्या रेतीच्या कणासारखा आकाशगंगेतील एक कःपदार्थ तारा -- आणि अशा अनेक आकाशगंगा! या कल्पनांसमोर आपल्या सभोवार उभे असलेले विशेषणांचे आणि विशेषनामांचे सर्व तट कोसळून पडतात. आणि आपले निखळ अस्तित्व--कशाचेही लिंपण वा मोजमाप नसलेले—आकाशाखाली उभे राहते. आकाशावर मी अनेक कविता लिहिल्या आहेत. एका कवितेत मी म्हटले आहे, "हे आकाशा, तू मला पुनःपुन्हा बोलावतोस ते कशासाठी? तुला माहीत नाही का, की तुझ्या अंतरंगातील संगीत एकदा माझ्या संज्ञेत झिरपले की माझे धरतीशी बांधलेले पाश तुटतील आणि मी भिरकावला जाईन, तुझ्या निराशय अंतराळात—जेथे अस्तित्व आणि गती यांवाचून दुसरे काहीच सत्य असत नाही!" मला नक्की माहीत नाही, पण संस्कृतीचा लखलखाट नाकारून निर्भेळ अस्तित्वाच्या प्रवाहात स्वतःला फेकून देणारे हिप्पींसारखे संप्रदाय अशा आकाशदर्शनातूनच निर्माण झाले असावेत.

आकाशावर अपार प्रेम असूनही हे किंवा असले संप्रदाय मला पटलेले नाहीत, कधी पटणारही नाहीत. आकाश माणसाला काही काळ निःसंग बनवते आणि वर सांगितलेल्या विचारांच्या लहरी त्याच्या मनात निर्माण करते हे खरे आहे. पण नंतर आपल्या लक्षात येते की, आकाश जर निराशय, कोणत्याही आकारमानाच्या, कालाच्या कल्पनांना थारा न देणारे आणि वैचारिक चेतना नसलेले असेल, तर त्याच्या अपार भव्यतेची कल्पनादेखील आकाशात नव्हे तर माझ्या मनातच निर्माण होत असली पाहिजे. आकाशाची अलौकिकता माझ्या मनातली आणि स्वतःसंबंधीची क्षुद्रताही माझ्या मनातलीच. केवळ आकाशालाच नव्हे तर सर्व वस्तुजाताला आशय आणि सौंदर्य देण्याचे सामर्थ्य लक्षावधी वर्षांच्या उत्क्रांतीने प्रगल्भ झालेल्या माणसाच्या मनामध्येच आहे. आज आपल्याला ज्ञात असलेल्या वैश्विक व्यवहारात माणसाचे मन हीच शिखरस्थ घटना आहे. या मानवी मनानेच निसर्गाशी स्पर्धा करणारी एक समांतर सत्ता विश्वात स्थापन केली आहे. हे नाकारून मानवी जीवन एखाद्या शून्यावस्थेत लोटण्याचा प्रयत्न करणे म्हणजे लाखो वर्षांच्या इतिहासाला, त्या इतिहासातील अशरण, अजिंक्य अशा मानवी विकासेच्छेला तिलांजली देणे आहे.

• • •

मग तुम्हाला कोणते विचार मांडावेसे वाटतात?

१. आकाश म्हणजे एक अलौकिक मौनीबाबा आहे

२. आकाशाकडे पाहून अनेक प्रश्न घोंघावत राहतात
३. सीमाहीन, कालहीन अस्तित्वाचे आपण एक खालच्या तळातील हिस्सेदार होतो
४. मानवी विकासेच्छेचे महत्त्व ध्यानात येते.

### ४.३.१ 'आकाशा'विषयी चिंतन

अनेक तत्त्ववेत्ते आपले विचार मांडीत असतात. त्यांची तात्त्विक मीमांसा आपल्याला मूलभूत तात्त्विक सिद्धान्तापर्यंत नेते. तुम्ही जो लेख वाचलात तो कविराज कुसुमाग्रजांचा. त्यांची प्रकृती चिंतनशील आहे. निसर्गातील घटने मागचे रहस्य शोधणे त्यांना आवडते. 'पृथ्वीचे प्रेमगीत' लिहिणारा कवी सूर्य आणि पृथ्वी यांच्यातील अलौकिक प्रीतीचे चिंतन करतो आणि म्हणतो—

> युगामागुनी चालली रे युगे ही
> करावी किती भास्करा वंचना!

कुसुमाग्रजाची चिंतनशीलता या लेखात प्रत्ययास येईल 'आकाश' पाहून त्यांच्या मनात येते.हा तर एक अलौकिक मौनीबाबा! प्रश्नांची उत्तरे न देणारा. आकाशाची विविध रूपे पाहता पाहता त्यांच्या मनात कितीतरी प्रश्न उभे राहतात! ते असे—

१. या सगळ्या असीम आणि अतर्क्य विश्वात आपले स्थान काय?
२. आकाशाशी नाते जोडल्यावर आपण लहान की मोठे ठरतो?
३. वैश्विक व्यवहारात माणसाचे मन हीच शिखरस्थ घटना आहे काय?

तसा लेख लहान पण त्यात केवढा आशय भरलेला आहे! या लेखातील विचार आकाशाविषयीच्या अनुभवातून उमलले आहेत. त्यामुळे येथे चिंतन ही अनुभवातीलच एक प्रक्रिया आहे.

### ४.३.२ कुसुमाग्रजांचे व्यक्तिमत्व

कुसुमाग्रज हे जातीवंत कवी. पण त्यांच्या व्यक्तिमत्वाला कवित्वाच्या अहंकाराचा एवढासा सुद्धा स्पर्श नाही. आकाशाची अनेक रूपे ते न्याहाळतात आणि त्यातले जे रूप संवादी असेल तेच त्यांच्या अनुभवाचा विषय होते.

आकाशाच्या संगीताचा छंद तसा जुना. आकाशाकडे पाहून जे अनेक तात्त्विक प्रश्न मनात उभे राहतात त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यात त्यांचे मन गढून जाते.

आकाशातील वास्तवाचे दर्शन कॉम्प्युटरच्या साहाय्याने काढलेल्या चित्रातून घडले आणि त्यांना आपण नगण्य आहोत, क्षुद्र आहोत हीच जाणीव झाली. ही जाणीव त्यांच्या चिंतनशील प्रवृत्तीची द्योतक आहे. ते लिहितात —

> आपले निखळ अस्तित्व—कशाचेही लिंपण वा
> मोजमाप नसलेले—आकाशाखाली उभे राहते.

### ४.३.३ आकाशाचा वेगळा अनुभव

आकाशावर अपार प्रेम करणाऱ्या कुसुमाग्रजांना आकाशाची भव्यता जाणवते. पण ते म्हणतात की ही भव्यतेची कल्पना आपल्या मनातच जन्मली.

म्हणजे माणसाचे मनच अनेक कल्पना आणि अनेक विचार यांची जन्मदात्री असते. हे मानवी मन गगनाला गवसणी घालू पाहते. हेच मानवी मन सर्व वस्तुजाताला सौंदर्य देते. हेच मन निसर्गाशी स्पर्धा करते.या विश्वातील अनेक रहस्यांचा शोध घेत राहते.

म्हणून तुकाराम महाराज म्हणतात —

> मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण
> मानवी मनाला क्षुद्र लेखण्याचे कारण नाही

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(क) आकाशाला अलौकिक मौनीबाबा असे का म्हटले?

..........................................................................................................

(ख) आकाशगंगेचे रेखाचित्र पाहून त्यांच्या मनात कोणता विचार आला?

..........................................................................................................

(ग) **जागा भरा.**

१. साऱ्याच गोष्टी उन्हात टाकलेल्या ........... खडयासारख्या विरघळतात.

२. सूर्याभोवती भ्रमण करणारी ........... म्हणजे आपली पृथ्वी!

३. आकाश माणसाला काही काळ ........... बनवते.

(घ) 'विकासेच्छा' यात विकास आणि इच्छा या दोन शब्दांचा संधी झाला. लोकेच्छा, ईश्वरेच्छा यातील दोन शब्द वेगवेगळे लिहा. तसेच शून्यावस्था, शतावधी यात कोणते दोन शब्द आहेत?

(ङ) अस्वस्थ म्हणजे स्वस्थ नाही असा. म्हणजे येथे 'अ' हा अभावदर्शक शब्द आहे. या उताऱ्यातील असे पाच शब्द शोधा.

## ४.४ नमुना उत्तरे

(क) आकाशामुळे अनेक प्रश्न मनात येतात. या प्रश्नांची उत्तरे न देणारा म्हणून अलौकिक मौनीबाबा.

(ख) आपण नगण्य आहोत, क्षुद्र आहोत ही जाणीव झाली.

(ग) बर्फाच्या; अदृश्य कणिका; निःसंग

(घ) लोक + इच्छा — लोकांची इच्छा
ईश्वर + इच्छा — ईश्वराची इच्छा
शून्य+अवस्था — शून्य अशी अवस्था
शत + अवधी — शत असा अवधी

(ङ) अगतिक, अशरण, असंख्य, अजिंक्य, अदृश्य.

## ४.५ अधिक अध्ययन

### ४.५.१ लेखकपरिचय

विष्णू वामन शिरवाडकर (जन्म १९१२). कुसुमाग्रज हे काव्यलेखनासाठी स्वीकारलेले टोपण नाव. प्रतिभावंत कवी आणि नाटककार.

जीवनलहरी, विशाखा, वादळवेल, हिमरेषा, छंदोमयी, मुक्तायन इत्यादी काव्यसंग्रह. दूरचे दिवे, ययाती आणि देवयानी, नटसम्राट, वीज म्हणाली धरतीला इत्यादी नाटके लोकप्रिय आहेत. जान्हवी, कल्पनेच्या तीरावर, वैष्णव इत्यादी त्यांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत.

१९६४ मध्ये पणजी येथील भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान. 'नटसम्राट'ला साहित्य अकादमीचा पुरस्कार. महाराष्ट्र शासनाने गौरववृत्ती दिली.

## ४.६ सारांश

आकाश म्हणजे एक अलौकिक मौनीबाबा. ते कोणत्याच प्रश्नांची उत्तरे देत नाही. आकाशाचे भव्य रूप पाहून वाटते की याच्यासमोर आपण अगदी नगण्य आहोत.पण तसे वाटून घेण्याचे कारण काय? मानवी मन हे कल्पना आणि विचारांची जन्मदात्री आहे. आकाशाच्या भव्यतेची कल्पना याच मानवी मनात जन्मलेली. या विश्वातील रहस्यांचा अगर गूढांचा वेध घेण्याचे सामर्थ्य मानवी मनात आहे. हे सामर्थ्य नाकारून चालणार नाही.

## ४.७ सरावासाठी स्वाध्याय

(अ) **खालील प्रश्न सोडवा.**

१. आकाश आणि कृष्ण यांच्यात साम्य कोणते? का?

२. क्षुद्रतेची जाणीव आपल्याला का होते?

३. आकाशाशी नाते जोडल्यावर कोणता अनुभव येतो?

४ माणसाच्या मनात अलौकिक सामर्थ्य आहे असे का म्हणतात ?

(ब) समुद्राचे अथांग रूप पाहून तुमच्या मनात जे विचार येतील ते लिहा.

## ४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१ **रूपरेषा** : वि. वा. शिरवाडकर
२ **ललित मासिकाचा** खास अंक ऑगस्ट १९८८
३ **साहित्य : अध्यापन आणि साहित्यप्रकार –** संपा. सुधीर रसाळ